नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक १२/०३/२०२६ (गुरूवार )

# नागपूर ग्रामीण पोलिसांनी पुन्हा एकदा गोवंश जनावरांची कत्तलीकरीता तस्करी/वाहतुक करणाऱ्या टोळीविरुद्ध महाराष्ट्र संघटीत गुन्हेगारी नियंत्रण अधिनियम (MCOCA) अन्वये कारवाई केली

**पोलीस स्टेशन भिवापुर**:— मा. श्री हर्ष ए. पोद्दार, पोलीस अधिक्षक, नागपुर ग्रामीण जिल्हा आणि श्री अनिल म्हस्के, अपर पोलीस अधिक्षक, नागपुर ग्रामीण जिल्हा यांचे मार्गदर्शनात भिवापुर पोलीसांनी अवैधरित्या गोवंश जनावरांची कत्तलीकामी तस्करी करणाऱ्या टोळीचा प्रमुख तसेच सदस्य अशा एकुण ५ आरोपीतांच्या टोळीविरुद्ध महाराष्ट्र संघटीत गुन्हेगारी नियंत्रण अधिनियम सन १९९९ लावला आहे. **अवैधरित्या गोवंश जनावरांची कत्तलीकामी तस्करी करणाऱ्या टोळीवर महाराष्ट्र संघटीत गुन्हेगारी नियंत्रण अधिनियम अन्वये ही नागपुर ग्रामीण जिल्हयातील दुसरी कारवाई आहे. यापुर्वी सुध्दा महाराष्ट्र राज्यात पहील्यांदाच नागपुर ग्रामीण पोलीसांनी कळमेश्वर येथील अवैधरित्या गोवंश तस्करीच्या गुन्हयात १२ आरोपींच्या टोळीवर महाराष्ट्र संघटीत गुन्हेगारी नियंत्रण अधिनियम अन्वये कारवाई केली आहे.**

दिनांक ०५/०२/२०२६ रोजी भिवापुर पोलीस स्टेशन येथे गुन्हा नोंद आहे. त्याची हकीकत याप्रमाणे आहे की, टाटा कंपनीचे झेनॉन पिकअप वाहन क्र एम.एच. ३४ ए. बी. ६९६४ चा चालक नामे श्रीकांत उर्फ छोटू यादवराव चौधरी, वय २९ वर्षे, रा. नागतरोली ता. भिवापूर याने ०८ गोवंश जनावरांना कोणतीही चारापाण्याची सोय न करता, अंत्यत कमी जागेत दाटीवाटीने कोंबुन, शिंगाला पायाला आखुड दोरखंडाने निर्दयतेने बांधुन त्याच्या वाहनाच्या डाल्यामध्ये कोंबुन कत्तलीकरिता अवैधरित्या जाणीवपुर्वक वाहतुक करत असताना भरधाव वेगाने व निष्काळजीपणे बेदरकारपणे त्याच्या ताब्यातील वाहन चालवुन राष्ट्रीय महामार्ग क्रं. ३५३ ड वरील मानोरा शिवार येथील भिवापूर ते उमरेड कडे जाणाऱ्या

रोडच्या कडेला असलेल्या मोठया झाडाला जबर धडक देवुन अपघात केला होता. वाहनाच्या डाल्यामध्ये कोंबुन असलेल्या एकुण ०८ जनावरांपैकी ५ जनावरे जखमी झाले होते तर ३ जनावरे मयत झाले होते. सदर प्रकरणी पोलीस स्टेशन भिवापूर अप.क्र. ७८/२६ कलम ३२५, २८१(१) भा.न्या.सं. सहकलम ११(१), (ड), (ई) (फ) प्राणी छळ प्रति.अधि.सहकलम ५,९ महा.पशुसंरक्षण अधि .सहकलम ११८ म.पो.का. अन्वये **गुन्हा नोंद करून सदर गुन्हयात आरोपी क्रं १) श्रीकांत यादवराव चौधरी,वय २७ वर्ष,रा.नागतरोली ता. भिवापूर आणि क्रं २) प्रफुल उर्फ भोला हेमराज चौधरी, वय २३ वर्ष, रा. नागतरोली ता. भिवापूर, जि. नागपूर आरोपींना अटक करण्यात आली .**

**भिवापुर पोलीसांनी सदर प्रकरणाचा सखोल तपास केला असता असे निदर्शनास आले की, सदर गुन्हा हा संघटीतरित्या केलेला असुन सदर टोळीमध्ये आरोपी क्रं. १) टोळी प्रमुख – श्रीकांत यादवराव चौधरी,वय २७ वर्ष,रा.नागतरोली ता. भिवापूर आणि टोळी सदस्य – आरोपी २) प्रफुल उर्फ भोला हेमराज चौधरी,वय २३ वर्ष, रा. नागतरोली ता. भिवापूर जि. नागपूर याच्यासह अजुन तीन आरोपी आहेत.** टोळी प्रमुख आणि टोळी सदस्य हे अवैधरित्या जनावरांची वाहतुक करण्यासाठी वेगवेगळे वाहन वापरतात, टोळीतील काही सदस्य जनावरांचा पुरवठा करतात, काही वाहतुक तसेच काही सदस्य जनावरे खरेदी करतात. नमुद टोळीने यांनी यापुर्वी नागपूर ग्रामीण जिल्हा, आणि चंद्रपुर जिल्हा येथील विवीध पोलीस स्टेशनचे हद्दीत गोवंशाची अवैध रित्या कत्तलीकरीता वाहतुक केल्याचे निष्पन्न झाले. संघटित गुन्हेगार टोळीचा प्रमुख श्रीकांत यादवराव चौधरी याचेविरुध्द नागपुर ग्रामीण जिल्हयातील पोलीस स्टेशन भिवापुर, बेला, कुही, बुट्टीबोरी, तसेच चंद्रपुर जिल्हयात सुध्दा गोवंश जनावराच्या अवैध वाहतुकीबाबत अनेक गुन्हे नोंद आहे. नमुद टोळी प्रमुख याला दाखल गुन्हयात अटक करून सुध्दा जामीनावर सुटल्यानंतर पुन्हा वेगवेगळया व नविन साथीदारांसोबत टोळी तयार करून संघटीत रित्या आर्थिक फायदयासाठी **गोवंशाना निर्दयतेने वागणुक देवुन त्यांची कत्तलीकरीता वाहतूक तसेच विक्री करतो. नमुद टोळीतील सदस्यांवर सुध्दा अवैध जनावर वाहतुकीचे अनेक गुन्हे नोंद आहे.** आरोपीतांचे गुन्हेगारी कृत्यांवर नियंत्रण ठेवण्याकरीता पोलीसांनी वेळोवेळी त्यांचेवर गुन्हे नोंद करून प्रतिबंधक कार्यवाही सुध्दा केली आहे. परंतु आरोपीतांनी त्यांची गुन्हेगारी गतिविधी निरंतर सुरूच ठेवली.

भिवापुर पोलीसांनी नमुद ५ आरोपीतांच्या टोळी विरुद्ध महाराष्ट्र संघटीत गुन्हेगारी नियंत्रण अधिनियम सन १९९९ (**MCOCA**) अन्वये प्रस्ताव तयार करून मा. पोलीस अधिक्षक, नागपुर ग्रामीण यांच्या मार्फतीने मा. विशेष पोलीस महानिरीक्षक, नागपूर परिक्षेत्र, नागपूर यांचे कडे सादर केला असता मा. विशेष पोलीस महानिरीक्षक, नागपूर परिक्षेत्र, नागपूर यांच्या कार्यालयाकडुन सदर प्रस्तावाला मंजुरी मिळाल्याने सदर गुन्हयात महाराष्ट्र संघटीत गुन्हेगारी नियंत्रण अधिनियम सन १९९९ (**MCOCA**) अन्वये कलमवाढ करण्यात आली आहे.



श्रीकांत यादवराव चौधरी



**प्रफुल उर्फ भोला हेमराज चौधरी**

## नागपुर ग्रामीण जिल्हयात वाहतूक नियमांचे वारंवार उल्लंघन करणाऱ्या वाहन चालकांवर कठोर कारवाई करून ड्रायव्हिंग लायसन्स रद्द करण्यात येणार

## २४८० प्रस्ताव प्रादेशिक परिवहन कार्यालयात रवाना

नागपुर ग्रामीण जिल्हयात वाहतूक नियमांचे वारंवार उल्लंघन करणाऱ्या वाहन चालकांवर कठोर कारवाई करण्याच्या दृष्टीने वारंवार ई—चालान (E-Challan) झालेल्या वाहन चालकांची माहिती संकलित करून करून त्यांच्या ड्रायव्हिंग लायसन्स निलंबित/रद्द करण्यासाठी प्रादेशिक परिवहन कार्यालयाकडे (RTO) प्रस्ताव पाठविण्यात आले आहे.

जिल्हा वाहतूक शाखा नागपुर ग्रामीण यांच्या कडुन करण्यात आलेल्या तपासणीत अनेक वाहन चालकांकडून वेगमर्यादा ओलांडणे, सिग्नल तोडणे,वाहनाच्या क्षमतेपेक्षा जास्त प्रवासी/वाहतूक करणे, मदयपान करून वाहन

चालविणे तसेच इतर वाहतूक नियमांचे वारंवार उल्लंघन होत असल्याचे निदर्शनास आले आहे. अशा नियमभंग करणाऱ्या **एकुण २,४८० वाहन चालकांचे ड्रायव्हिंग लायसन्स निलंबित/रद्द करण्यासाठी प्रादेशिक परिवहन कार्यालयाकडे (RTO) प्रस्ताव पाठविण्यात आले आहे.**

नागरिकांनी स्वत:च्या तसेच इतरांच्या सुरक्षेच्या दृष्टीने वाहतूक नियमांचे पालन करावे, असे आवाहन नागपुर ग्रामीण पोलीस दलातर्फे करण्यात आले आहे. नियमांचे उल्लंघन करणाऱ्याविरुद्ध पुढेही कठोर कारवाई सुरू राहणार आहे.

## २३९ ग्रॅम गांजा, रोख रक्कमेसह ८ हजारांचा मुद्देमाल जप्त, आरोपींविरूद्ध गुन्हा नोंद, १ आरोपी अटक नागपूर ग्रामीण पोलीसांची कामगिरी

**पोलीस स्टेशन वडोदा** :— दिनांक १२/०३/२०२६ रोजी अंमली पदार्थ विरोधी कारवाई पथक हे कन्हान उपविभागात पेट्रोलींग करीत असतांना त्यांना गुप्त बातमीदाराने अंमली पदार्थ गांजा बाबत खात्रीशिर माहीती दिली. नमुद पथकाला पेट्रोलींग दरम्यान नागपुर ते वडोदा रोडवर एक इसम बॅग घेवुन उभा दिसुन आला. नमुद इसम शासकिय पोलीस वाहन पाहुन त्याची बॅग घेवुन भोवरी गावाकडे जाणाऱ्या रोड ने पळुन जावु लागला. अंमली पदार्थ विरोधी कारवाई पथक यांनी सदर माहीती वडोदा पोलीस स्टेशनला देवुन त्यांच्या सह संयुक्त कारवाई करत आरोपीचा शिताफिने पाठलाग करून त्याला खंडेलवाल वेअर हाउस समोर पकडले. आरोपीला नाव पत्ता विचारपुस केली असता त्याचे नाव **प्रफुल्ल यशवंतराव नगरारे, वय ३३ वर्षे, रा.वार्ड क्र. ४ , नांद, ता.भिवापुर जि.नागपुर ह.मु. प्रधानमंत्री आवास योजना बिल्डींग क्र ६२ , सिम्बॉसीस कॉलेज रोड जवळ, वाठोडा, नागपुर** अशी माहीती प्राप्त झाली. पोलीसांनी पंचासमक्ष त्याच्या ताब्यातील बॅगची झडती घेतली अंमली पदार्थ गांजा मिळुन आला.

नमुद आरोपीच्या ताब्यातुन १) अंमली पदार्थ गांजा वजन २३९ ग्रॅम किंमती ५०००/—रुपये, रोख रक्कम, छोटया मोठया आकाराच्या प्लॉस्टीक पिशव्या आणि मोबाईल असा एकुण ८,०००/— रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

नमुद प्रकरणी आरोपीविरूद्ध पोलीस स्टेशन वडोदा येथे एन.डि.पि.एस. कायदयान्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे. आरोपीला अटक करण्याची प्रक्रीया सुरू आहे.



# अवैधरित्या रेतीची चोरटी वाहतुक करणाऱ्या आरोपीतांविरूध्द ०२ गुन्हे नोंद वाहनासह ६१ लाख २६ हजार रूपयांचा मुद्देमाल जप्त नरखेड पोलीसांची कामगिरी

**पोलीस स्टेशन नरखेड:—** दिनांक १०/०३/२०२६ रोजी नरखेड पोलीस पेट्रोलींग करीत असतांना पोलीसांना गुप्त बातमीदारांकडुन खात्रीशीर माहीती मिळाली की, अवैधरित्या रेती ची चोरटी वाहतूक केली जात आहे. मिळालेल्या माहीतीच्या आधारे पोलीसांनी मौजा बेलोना शिवारात नाकाबंदी करून वाहन कं. १) दहा चक्का टिप्पर क्र. एम एच ४० बी एफ ८४५५ आणि वाहन कं २) १२ चक्का टिप्पर क्रमांक एम एच ४० डी सी २१८० या वाहनांना थांबवुन वाहनाची पाहणी केली असता त्यामध्ये रेती आढळुन आली. टिप्पर क्र. एम एच ४० बी एफ ८४५५ चा **चालक आरोपी नामे १) आकाश उमेशराव धुर्वे, वय २५ वर्ष, रा. हिवरखेड, ता. मोर्शी, जि. अमरावती सोबत क्लिनर आरोपी २) साहिल ईश्वर गिरी, वय २५ वर्ष, रा. पुसला ता. वरूड, जि. अमरावती** हे जागीच मिळुन आले. सदर ८ ब्रास रेती मिळुन आली. वाहनामध्ये परवान्यापेक्षा जास्त रेती वाहतुक करीत असल्याचे दिसुन आले. तसेच १२ चक्का टिप्पर क्रमांक एम एच ४० डी सी २१८० चा चालक नामे **१) साहिल अश्फाक दिवाण, वय २१ वर्ष, सोबत आरोपी क्रमांक क्लिनर नामे २) शोहेब मोहम्मद अली शेख वय २२ वर्ष** हे मिळुन आले. सदर टिप्पर मध्ये १० ब्रास रेती विनापरवाना वाहतुक करतांना मिळुन आले.वाहन मालकाचे नाव **३) दीपक बेले, सर्व रा. मोवाड तह. नरखेड असे असल्याची माहीती प्राप्त झाली.**

**पोलीसांनी पंचासमक्ष वर नमुद १) दोन्ही वाहने किंमती ६०००,०००/—रूपये २) दोन्ही वाहनामधील एकुण १८ ब्रास रेती किंमती १,२६,०००/—रूपये मुद्देमाल असा एकुण ६१,२६,०००/— रूपयाचा मुद्देमाल जप्त केला. सदर प्रकरणी टिप्पर क्र. एम एच ४०बी एफ ८४५५ चा चालक नामे १) आकाश उमेशराव धुर्वे, वय २५ वर्ष, रा. हिवरखेड, ता. मोर्शी, जि. अमरावती २) साहिल ईश्वर गिरी, वय २५ वर्ष, रा. पुसला, ता. वरूड, जि. अमरावती आणि नमुद वाहनाचा मालक यांच्या विरूध्द १ गुन्हा आणि टिप्पर क्रमांक एम एच ४० डी सी २१८० १) साहिल अश्फाक दिवाण, वय २१ वर्ष, सोबत क्लिनर नामे २) शोहेब मोहम्मद अली शेख, वय २२ वर्ष, ३) वाहन मालक नामे दीपक बेले, सर्व रा.**

**मोवाड तह. नरखेड यांच्या विरूध्द १ गुन्हे असे कलम ३०३(२), ४९, १९४ भा.न्या.सं अन्वये २ गुन्हे दाखल करण्यात आले आहे.**

## अवैधरित्या मुरूमाची चोरटी वाहतुक करणाऱ्या आरोपीविरूध्द गुन्हा नोंद वाहनासह १२ लाख १० हजार रूपयांचा मुद्देमाल जप्त केळवद पोलीसांची कामगिरी

**पोलीस स्टेशन केळवद** :— दिनांक ११/०३/२०२६ रोजी केळवद पोलीस पेट्रोलींग करीत असतांना पोलीसांना गुप्त बातमीदारांकडुन खात्रीशीर माहीती मिळाली की, एक अशोक लेलॅन्ड कंपनीचा टिप्पर क्रं एम एच ४०/ए.के ४८०८ यामध्ये माळेगाव मध्यप्रदेश राज्यातुन विनापरवाना मुरुम भरून कवठा मार्गे केळवद कडे येत आहे. मिळालेल्या माहितीच्या आधारे पोलीसांनी मौजा कवठा शिवार, कवठा ते केळवद रोडवर नाकाबंदी केली असता एक अशोक लेलॅन्ड कंपनीचा टिप्पर क्रं एम एच ४० ए.के ४८०८ मिळून आल्याने वाहन थांबवुन वाहनाची पाहणी केली असता त्यामध्ये मुरूम आढळुन आले. टिप्परचा **चालक नामे अनिकेत राजेश निकोसे, वय २४ वर्ष, रा. रामपुरी, ता. सावनेर, जि. नागपूर** हा मिळुन आला. पोलीसांनी आरोपी चालकास मुरूम वाहतूकीच्या परवान्याबाबत विचारपुस केली असता त्याच्याकडे कोणताही परवाना नसल्याबाबत माहीती प्राप्त झाली.

**पोलीसांनी पंचासमक्ष वर नमुद वाहन १) एक अशोक लेलॅन्ड कंपनीचा टिप्पर क्रं एम एच ४० ए.के ४८०८ किंमती १२,००,०००/—रूपये २) ०५ ब्रास मुरूम किंमती १०,०००/— रूपये असा एकुण १२,१०,०००/— रूपयांचा मुद्देमाल जप्त केला. नमुद आरोपी चालक अनिकेत राजेश निकोसे, वय २४ वर्ष, रा. रामपुरी, ता. सावनेर, जि. नागपूर याच्या विरूध्द पोस्टे केळवद येथे कलम ३०३(२) भा.न्या.सं सहकलम ४८(७), ४८(८) महाराष्ट्र जमीन महसूल संहिता सहकलम ४, २१ खाण खनिज अधिनियम, सहकलम ३ सार्वजनिक मालमत्तेचे नुकसान १९८४ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.**

# गोवंश जनावरांची अवैधरित्या वाहतुक करणाऱ्या आरोपीविरूध्द गुन्हा नोंद ०८ गोवंश जनावरांची सुटका, मौदा पोलीसांची कामगिरी

**पोलीस स्टेशन मौदा** :— दिनांक १२/०३/२०२६ रोजी मौदा पोलीसांना गुप्त बातमीदारांकडुन खात्रीशीर माहीती मिळाली की, भंडारा ते नागपूर रोडने अवैधरित्या गोवंश जनावरांची वाहतुक केली जात आहे. मिळालेल्या माहीतीच्या आधारे पोलीसांनी माथनी शिवारात भंडारा ते नागपूर रोडवर नाकाबंदी केली असता नाकाबंदी दरम्यान महेंद्रा बोलेरो क्र. एम एच ४०सी टी ९७२७ हे वाहन मिळुन आले. सदर वाहन चालकास थांबवण्याचा इशारा केला असता वाहन चालकाने पोलीसांचे वाहन पाहुन गाडी थांबवुन वाहनामधुन उडी मारून पळुन गेला. पोलीसांनी पंचासमक्ष वाहनाची तपासणी केली असता त्यामध्ये ०८ गोवंश जनावरे असे मिळुन आले. नमुद जनावरांना कोणतीही चारापाण्याची सोय न करता, अत्यंत कमी जागेत दाटीवाटीने कोंबुन, शिंगाला व पायाला आखुड दोरखंडाने बांधुन वाहतुक करीत असल्याचे दिसुन आले. पोलीसांनी पंचासमक्ष घटनास्थळावरून महेंद्रा बोलेरो क्र. एम एच ४० सी टी ९७२७ किंमती ६,००,०००/— रूपये आणि ०८ गोवंश जनावरे किंमती ८०,०००/— रूपये असा एकुण ६,८०,०००/— रूपयांचा मुददेमाल जप्त केला आहे.

**नमुद प्रकरणी आरोपी विरूद्ध कलम ११(१) (ड) (ई)(फ) प्राण्यांना निर्दयतेने वाहतुक प्रतीबंधक अधिनियम, सहकलम ५ (अ) (१) (९) महाराष्ट्र पशु संरक्षण अधिनियम भान्यासं अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे.**



# अवैधरित्या विनापरवाना देशी दारूची वाहतुक करणाऱ्या आरोपीविरूद्ध गुन्हा नोंद, ३१ हजार ४० रूपयाचा मुद्देमाल जप्त, पोलीस स्टेशन काटोल यांची कामगिरी

पोलीस स्टेशन काटोल :— दिनांक ११/०३/२०२६ रोजी काटोल पोलीसांना गुप्त बातमीदारांकडुन खात्रीशीर माहीती मिळाली की, मोटरसायकलने **अवैधरीत्या देशी दारूची वाहतुक केली** जात आहे. मिळालेल्या माहीतीच्या आधारे पोलीसांनी तात्काळ मौजा बाजार चौक, दिग्रस बुर्ज येथे नाकाबंदी केली असता नाकाबंदी दरम्यान हिरो होन्डा कंपनीची सि डी १०० मोटर सायकल क्र. एम एच ३१ बि ५६२८ मिळुन आली. वाहन थांबवुन वाहनाची पंचासमक्ष पाहणी केली असता देशी दारू मिळुन आली. **आरोपी नामे अशोक नथ्थुजी सुरजुसे, रा. दिग्रस बुर्ज ,ता. काटोल, जि. नागपुर हा अवैधरीत्या देशी दारूची वाहतुक करतांना मिळुन आला. पोलीसांनी पंचासमक्ष १) देशी दारूच्या १३ निपा किंमती १०४०/— रूपये, हिरो होन्डा कंपनीची सि डी १०० मोटरसायकल क्र. एम एच ३१ बि ५६२८ किंमती ३०,०००/—रू असा एकुण किंमती ३१,०४०/— रुपयांचा मुददेमाल जप्त केला आहे.**

**नमुद आरोपी विरूध्द पोलीस स्टेशन काटोल येथे महाराष्ट्र दारुबंदी अधिनियम अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे.**

मा. पोलीस अधिक्षक
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर
यांच्या मान्यतेने